# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे कार्यालय

## जाहिर निविदा

**संदर्भ** — १. मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे दिनांक २४.०१.२०२४ रोजीच्या टिपणीवरील आदेश.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे कार्यालयातील संगणक विभाग (खोली क्रमांक ४२ )येथील सर्व्हर सोबत असलेली हार्डडीक्स मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे कडुन दिनांक २५/०२/२०१९ ला पुरवठा करण्यात आलेली होती. तिची वारंटी ही तिन वर्षाची असल्यामुळे ती संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे संगणक विभागातील सर्व्हरचे बॅक अप व डेली डाटा स्टोअर होत नसल्यामुळे सर्व्हरचे बॅक अप घेण्याकरीता व डेटा स्टोअर करण्याकरीता लवकरात लवकर एक हार्डडीक्स खरेदी करण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे एक हार्डडिक्स खरेदी करण्याकरीता इच्छुक असणा—या स्थानीक पुरवठादार/दुकानदारांनी त्याबाबतची निवीदा हार्डडिक्स चे दर नमुद करुन सिलिबंद लिफाफयात सादर करावेत असे जाहीर करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथील संगणक विभागामध्ये असलेल्या सर्व्हरकरीता लागणारी एक हार्डडिक्स खरेदी करण्यासाठी स्थानीक पुरवठादार/दुकानदाराकडुन एक हार्डडिक्सचे दर नमुद करुन एका बंद लिफाफयात, ज्यावर **"नविन हार्डडिक्स खरेदीची निवीदा "** असे ठळक पणे नमुद करुन सदर निवीदेचा लिफाफा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे नांवे जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे **दिनांक ०३/०२/२०२४ ला सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निवीदा विचारात घेण्यात येणार नाही.

चंद्रपूर

दिनांक — २४/०१/२०२४

आदेशान्वये,

जिल्हा प्रकल्प समन्वयक तथा<br>
जिल्हा न्यायाधीश—३, चंद्रपूर